RNI No. MAHBIL/2009/31733

Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ४१] बुधवार, ऑगस्ट १, २०१२/श्रावण १०, शके १९३४ [पृष्ठे ४
किंमत : रुपये १४.००

**असाधारण क्रमांक १०३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २७ जुलै २०१२.

**अधिसूचना**

**बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५.**

क्रमांक बाहआ.२००८/प्र.क्र.१७ (सुटी धारीका)/का-९.— बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा ४) याच्या कलम ३६ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे, प्रदान करण्यात आलेल्या

अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग नियम, २०१० यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (सुधारणा) नियम, २०११ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग नियम, २०१० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) च्या नियम ८ मधील, पोट-नियम (९) नंतर, पुढील पोट-नियम जादा दाखल करण्यात येईल :—

" (१०) आयोग, अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी, आयोगाच्या कार्यालयात नियमितपणे बैठक घेईल, परंतु, ही बैठक, प्रत्येक कॅलेंडर महिन्यातून एकदा घेण्यात येईल. "

३. मुख्य नियमांच्या नियम ११ मधील, पोट-नियम (२) मध्ये, " विधी " या मजकुरानंतर, " वैद्यकीय क्षेत्रातील बाल रोग तज्ज्ञ " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम १२ मधील, पोट-नियम (१) ऐवजी, पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

" (१) आयोग, अगोदरच्या वर्षाचा वार्षिक अहवाल, लगतनंतरच्या वर्षांच्या ३० जून रोजी किंवा त्यापूर्वी राज्य शासनाकडे सादर करील आणि राज्य शासन, असा वार्षिक अहवाल, उक्त लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वन्दना कृष्णा,**

शासनाच्या प्रधान सचिव.